## निशाणी क्र.११० खालील आदेश

प्रतिदाव्यातील वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज वादी क्र.१ नाथा सोपान निकम यांचे वारस अभिलेखावर आणणेस विलंब झालेने झालेला उपशम रद्द होवून मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

(२) प्रतिदाव्यातील वादी यांचे असे कथन आहे की, वादी क्र.१ नाथा निकम हे दि.२९.०७.२०२४ रोजी मयत झाले आहेत. प्रतिदाव्यातील वादी यांना वादी क्र.१ यांचे वारस वेळेत अभिलेखावर आणता आले नसलेने त्यांचे वारस रेकॉर्डवर आणणेस विलंब झालेने त्यांचेविरुध्दचा दावा उपशम झालेला आहे. त्यामुळे, वादी यांनी प्रस्तुत अर्जान्वये उपशम रद्द होवून मिळणेची विनंती केलेली आहे.

(३) प्रतिदाव्यातील प्रतिवादीतर्फे म्हणणे सादर करुन अर्जात कोणतेही योग्य कारण नमूद नसलेमुळे वादीचा अर्ज नामंजूर करणेची विनंती केली. तसेच कोर्ट अर्ज मंजूर करणेचे निष्कर्षापर्यंत आलेस जास्तीत जास्त भूर्दंड लावणेत यावा अशी विनंती केली.

(४) प्रस्तुतचा निशाणी क्र.११० कडील अर्ज, त्यावरील म्हणणे व त्या पुष्ठ्यर्थ दाखल केलेले प्रतिज्ञापत्र यांचे अवलोकन केले. प्रतिदाव्यातील वादी व प्रतिवादी यांचेतर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुतच्या प्रतिदाव्यातील वादीने प्रतिवादीविरुध्द स्पेसिफिक रिलीफ अॅक्ट सेक्शन १९, ३४ अतिक्रमण दूर करणेसाठी, ठरावासाठी व कब्जासाठी प्रतिदावा दाखल केला आहे. प्रतिदाव्यातील वादी यांनी प्रस्तुत अर्जान्वये वादी क्र.१ नाथा सोपान निकम यांचे वारस अभिलेखावर घेणेस विलंब झालेने त्यांचे विरुध्दचा दावा उपशम रद्द होवून मिळणेबाबत विनंती केलेली आहे. वादीचा निशाणी क्र.१११ कडील विलंब माफीचा अर्ज मंजूर केलेला आहे. दाव्याचा गुणदोषांवर निपटारा होणेकरिता तसेच फलित व परिणामकारक हुकूमनामा होणेकरिता, तसेच, दाव्याचे स्वरुप विचारात

घेता न्यायहिताच्या दृष्टीने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे;

**आदेश**

प्रतिदाव्यातील वादी यांचा निशाणी क्र.११० कडील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

VAISHALI DIGAMBARRAO SHIRSE

Digitally signed by VAISHALI DIGAMBARRAO SHIRSE
Date: 2025.11.12 11:26:33 +0530

विटा. (श्रीमती.व्ही.डी.शिरसे)
दिनांकः- १०.११.२०२५ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, विटा,
ता.खानापूर, जि.सांगली.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | G.U.Varude, |
| Name of the Court | :- | Smt. V.D.Shirse<br>Jt.Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C.,<br>Vita. Tal:-Khanapur. |
| Date of decision | :- | 10.11.2025 |
| Order signed by P.O. on | :- | 10.11.2025 |
| Order uploaded on | :- | 12.11.2025 |